# प्रेसनोट

दि.१२/०८/२०२१

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक/अहमदनगर |
| गुन्हा नोंद क्रमांक | श्रीरामपूर शहर पो.स्टे., जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ |
| आरोपीचे नांव व कार्यालय | १)बापुसाहेब बाळासाहेब हरिश्चंद्रे, वय–५२ वर्ष, धंदा–नोकरी, प्रभारी प्राचार्य, वर्ग–१, होमिओपॅथी मेडीकल कॉलेज, वडाळा महादेव, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर<br>२)भारती बापुसाहेब इथापे, वय–३४ वर्ष, धंदा–नोकरी, लिपीक, वर्ग–३, होमिओपॅथी मेडीकल कॉलेज, वडाळा महादेव, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर |
| मागणी केलेल्या लाचेची रक्कम | रुपये १,४७,५००/– |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रुपये १,४७,५००/– |
| थोडक्यात माहिती | प्रस्तुत बातमीतील हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांच्या मुलीचे बी.एच.एम.एस. पदवीचे पासिंग सर्टिफिकेट व इंटरशिप पुर्ण केल्याबाबतचे सर्टिफिकेट देणे करीता यातील आरोपी लोकसेवक क्र.१ बापुसाहेब बाळासाहेब हरिश्चंद्रे यांनी तक्रारदार व त्यांची मुलगी यांचेकडे १,४७,५००/– रुपये लाचेची मागणी केली.<br>तक्रारदार यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे दि.१०/८/२०२१ रोजी दिलेल्या तक्रारीवरुन आज दि.१२/८/२०२१ रोजी केलेल्या लाच मागणी पडताळणी मध्ये आरोपी लोकसेवक क्र.१ बापुसाहेब बाळासाहेब हरिश्चंद्रे यांनी तक्रारदार व त्यांची मुलगी यांचेकडे बी.एच.एम.एस. पदवीचे पासिंग सर्टिफिकेट व इंटरशिप पुर्ण केल्याबाबतचे सर्टिफिकेट देणे करीता, इंटरशिपचा एकुण ३६५ दिवसांचा कालावधी असून सदरचा कालावधी संबंधीत महाविद्यालयातील हॉस्पिटल मध्ये पूर्ण करणे आवश्यक असते. यातील तक्रारदार यांच्या मुलीने इंटरशिपच्या ३६५ दिवसांपैकी ७० दिवसांचा कालावधी संबंधीत महाविद्यालयातील हॉस्पिटल मध्ये पूर्ण केला होता व उर्वरीत २९५ दिवसांचा कालावधी खाजगी हॉस्पिटल मध्ये पूर्ण केला होता. खाजगी हॉस्पिटल मध्ये पूर्ण केलेल्या २९५ दिवसाच्या कालावधीचे प्रति दिवसाचे ५००/– रुपये प्रमाणे एकूण १,४७,५००/– रुपये पैसे घेवुन इंटरशिप कालावधी ॲडजस्ट करुन देणेसाठी यातील आरोपी लोकसेवक क्र.१ बापुसाहेब बाळासाहेब हरिश्चंद्रे यांनी तक्रारदार व त्यांची मुलगी यांचेकडे पंचासमक्ष १,४७,५००/– रुपये लाचेची मागणी केली. त्यानंतर आयोजित सापळा कारवाई दरम्यान सदर लाचेची रक्कम आरोपी लोकसेवक क्र.१ बापुसाहेब बाळासाहेब हरिश्चंद्रे यांचे सांगणेवरुन आरोपी लोकसेविका क्र.२ भारती बापुसाहेब इथापे यांनी पंचासमक्ष स्विकारली असता दोन्ही आरोपी यांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. सदर बाबत त्यांचेविरुध्द श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन, जि.अहमदनगर येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालू आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागण्या–या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता :– लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकिय इमारत, टि.व्ही. सेंटरसमोर, सावेडी, अहमदनगर

संकेतस्थळ :– acbmaharashtra.gov.in

ई–मेल ऑनलाईन तक्रार :– acbwebmail@mahapolice.gov.in

ॲप्लीकेशन :– acbmaharashtra.net

टोल फ्री क्रमांक :– १०६४

दुरध्वनी क्रमांक :– ०२४१–२४२३६७७

व्हॉटस अप क्रमांक:– ९९३०९९७७००

(हरीष खेडेकर)
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
अहमदनगर